पुढारी MY कोल्हापूर सोमवार, ९ जून २०२५

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार ॥

# श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर



## शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची
## १०७ वी जयंती समारंभ



**सस्नेह निमंत्रण**

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे :

**मा. नामदार प्रकाशरावजी आबिटकरसो**

(सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री तथा पालकमंत्री, कोल्हापूर)

कार्यक्रमाचे अध्यक्ष:

**मा. प्राचार्य अभयकुमारजी साळुंखे** (कार्याध्यक्ष)

निमंत्रक : **प्राचार्या सौ. शुभांगी गावडे** (सचिवा)

कार्यक्रम सोमवार, दिनांक ९ जून २०२५ रोजी, सकाळी १०.३० वा.

स्थळ : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन, ताराबाई पार्क, कोल्हापूर.

पुढारी | ६
सोमवार । ९ जून २०२५

# डॉ. संजय लठ्ठे यांची तुर्की विद्यापीठात अभ्यास दौऱ्यासाठी निवड

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयामधील भौतिकशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. संजय लठ्ठे यांची कोच युनिव्हर्सिटी इस्तंबूल, तुर्की येथे एक महिन्याच्या अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. डॉ. लठ्ठे २३ मे ते २१ जूनदरम्यान तेथील विद्यापीठात संशोधनाचे काम करणार आहेत. कोच विद्यापीठातील प्रा. लिव्हेंट देमिरेल यांच्या संशोधन प्रयोगशाळेत आपोआप स्वच्छ होणाऱ्या सोलर सेल पॅनल या विषयावर ते संशोधन करणार आहेत. डॉ. लठ्ठे यांना संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, अंतर्गत मूल्यमापन हमी कक्षच्या डॉ. श्रुती जोशी, प्रबंधक सचिन धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत संवाद
सोमवार, ९ जून २०२५

# शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती साजरी

**कोल्हापूर :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची १०७ वी जयंती सोमवारी ९ जून रोजी सकाळी संस्थेत होत आहे.

प्रमुख पाहुणे पालकमंत्री प्रकाश आबिटकर लाभले आहेत. या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी पत्रकाव्दारे केले आहे.

तरुण भारत सोमवार, ९ जून २०२५

# विवेकानंद कॉलेजमध्ये पर्यावरण दिन साजरा

प्रतिनिधी

कोल्हापूर

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त डॉ. पी. बी. तेली, डॉ. बी. टी. दांगट आणि डॉ.जी. के. सोनटक्के यांनी संपादित केलेल्या एन्वहॉर्नमेंट कन्सर्वेशन, सस्टेनेबिलिटी आणि क्लाइमेट ॲक्शन" या पुस्तकाचे प्रकाशन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते झाले.

या पुस्तकासाठी संस्थेच्या सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, डॉ. श्रुती जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. कुंभार, गणेश सातव यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी प्रबंधक सचिन धनवडे, विवेकानंद संस्थेचे शिक्ष कर्मचारी उपस्थित होते.